आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री ८.०५ वाजता

९ ऑक्टोबर २०२३ –सोमवार

**ठळक बातम्या**

- राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोरम विधानसभा निवडणुकीसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान, ३ डिसेंबरला मतमोजणी
- राज्यातल्या ३४ जिल्ह्यांमध्ये सर्व सुविधायुक्त सुपर स्पेशालिटी रुग्णालयं उभारण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
- आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर शुक्रवारी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात एकत्र सुनावणी
- तामिळनाडूत फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात १० जणांचा मृत्यू

  **आणि**

- अर्थशास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार अमेरिकी अर्थतज्ञ क्लॉडीया गोल्डीन यांना जाहीर

**<><><><><>**

निवडणूक आयोगानं आज पाच राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकांची घोषणा केली. राजस्थानमध्ये २३ नोव्हेंबरला मतदान होईल. मध्य प्रदेशमध्ये १७ नोव्हेंबरला, तेलंगणामध्ये ३० नोव्हेंबरला, छत्तीसगढ मध्ये सात आणि १७ नोव्हेंबरला, तर मिझोराम मध्ये सात नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या सर्व राज्यांमध्ये तीन डिसेंबरला मतमोजणी होणार असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी सांगितलं.

या पाच राज्यांमध्ये मिळून विधानसभेच्या ६७९ जागा आणि १६ कोटी मतदार आहेत. यात सुमारे ६० लाख मतदार प्रथमच मतदान करणार आहेत.

नागरिक कोणत्याही प्रकारच्या निवडणूक गैरप्रकारांची सी व्हिजिल ॲपद्वारे निवडणूक आयोगाकडे कडे तक्रार करू शकतात. प्रत्येक तक्रारीला १०० मिनिटांत प्रतिसाद मिळेल, असं कुमार म्हणाले. बेकायदेशीर रोकड, दारू, मोफत वस्तू आणि अंमली पदार्थांची सीमा ओलांडून होणारी कोणतीही हालचाल रोखण्यासाठी पाच राज्यांमध्ये ९४० हून अधिक आंतरराज्य सीमा तपासणी नाके उभारण्यात आले असल्यांचं देखील त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राजस्थान विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं आज पहिली उमेदवार यादी जाहीर केली. ४१ उमेदवारांच्या या यादीत लोकसभेतले ६ आणि राज्यसभेतले १ अशा ७ खासदारांचा समावेश आहे.

मध्यप्रदेश विधानसभा निवडणुकीसाठीही भाजपानं आज ५७ उमेदवारांचा समावेश असलेली तिसरी उमेदवार यादी जाहीर केली. त्यात मध्यप्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना त्यांच्या सध्याच्या दुधनी मतदार संघातून, तर मंत्री नरोत्तम मिश्र यांना दतिया मतदार संघातून उमेदवारी दिली आहे. २३० सदस्यीय विधानसभेसाठी भाजपाने आतापर्यंत १३५ उमेदवार जाहीर केले आहेत.

छत्तीसगडमधे विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं आज ६४ उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यानुसार माजी मुख्यमंत्री रमण सिंग राजनंदगाव मतदार संघातून, केंद्रीय मंत्री रेणुका सिंग भरतपूर-सोनहाट मतदार संघातून निवडणूक लढवतील. भाजपा प्रदेशाध्यक्ष अरुण साव यांना लोर्मी मतदार संघातून उमेदवारी दिली आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या ३४ जिल्ह्यांमध्ये सर्व सुविधांयुक्त स्पेशालिटी रुग्णालयं उभारण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. सार्वजनिक आरोग्यावरील खर्च दुप्पट करणे, २०३५ पर्यंत आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षणाचा विचार करून राज्यासाठी आरोग्याचे सर्वंकष व्हिजन तयार करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमण्याचेही निर्देश त्यांनी दिले. राज्यातल्या आरोग्य यंत्रणेच्या आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते.

वैद्यकीय महाविद्यालयांना संलग्न झाल्याने १३ जिल्हा रुग्णालये बंद झाली आहेत. तसंच वैद्यकीय शिक्षण विभागाकडे १२ जिल्हा रुग्णालयं हस्तांतरित करण्यात येणार आहेत. त्यामुळं २५ जिल्ह्यांमध्ये नवीन अद्ययावत आणि सर्व सुविधा असलेली जिल्हा रुग्णालयं उभारण्याचे तसेच सध्या वैद्यकीय महाविद्यालयांशी जोडलेल्या जिल्हा रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा नियोजनमधून औषध खरेदीचे अधिकार दिले आहेत. त्यामुळे त्यांनी वेळ न गमावता आपापल्या जिल्ह्यांतील औषध खरेदी, वैद्यकीय उपकरण खरेदी दरपत्रकानुसार तत्काळ करून घ्यावी असे मुख्यमंत्र्यांनी म्हणाले.

सार्वजनिक आरोग्य विभागात १९ हजार ६९५ पदे रिक्त आहेत. ती भरण्याची कार्यवाही टीसीएसमार्फत सुरू आहे. पुढील महिन्यापर्यंत ही पदे भरली जातील हे पाहावे अशी सूचनाही त्यांनी केली.

**<><><><>**

आमदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या याचिकेवर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात एकत्र सुनावणी होणार आहे. अपात्रतेबाबत विधानसभा अध्यक्ष वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करणारी

याचिका शरद पवार गटाकडून जयंत पाटील यांनी सादर केली आहे. त्यावर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. तेव्हा न्यायालयानं हे आदेश दिल्याची माहिती शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिले. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना नोटीस बजावली आहे.

**<><><><>**

शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये लोकशाहीचं पालन झालं नाही याचा पुनरुच्चार अजित पवार गटानं आज केंद्रीय निवडणूक आयोगात झालेल्या सुनावणीत केला. पक्षाच्या गेल्या वर्षी झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनात तसंच नियुक्तींमध्ये लोकशाही मूल्यांचं पालन झालं नाही, असा दावा अजित पवार गटाचे वकील नीरज कौल यांनी केला. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालचा पक्ष हा मूळ राष्ट्रवादी काँग्रेस आहे आणि त्यांच्याचकडे सर्वाधिक सदस्यांचा पाठिंबा असल्याचा दावा या गटानं केला.

याप्रकरणी पुढची सुनावणी ९ नोव्हेंबरला होणार आहे, अशी माहिती शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी दिली. त्यावेळी शरद पवार गटाचा युक्तीवाद सुरू होईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

तामिळनाडुच्या अरियालूर जिल्ह्यात फटाक्यांच्या कारखान्यात आज सकाळी झालेल्या स्फोटात १० जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर दोन मृतदेह बाहेर काढल्याचं पोलिसांनी सांगितलं. दोनच दिवसांपूर्वी तमिळनाडू-कर्नाटक सीमेवर फटक्यांच्या कारखान्याला लागलेल्या आगीत १४ लोकांचा मृत्यू झाला होता.

**<><><><>**

देशभरात जातनिहाय जनगणनेच्या कल्पनेला पाठिंबा देण्याचा निर्णय काँग्रेस कार्यकारिणीनं एकमतानं घेतला आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आज वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

स्वातंत्र्यापासून २०१४ पर्यंत काँग्रेसनं जातनिहाय जनगणनेला कायम विरोध केला असल्याचं भाजपा नेते धर्मेंद्र प्रधान यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

कॅबिनेट सचिव राजीव गौबा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन समितीनं सिक्कीममधल्या पूर परिस्थितीचा आज आढावा घेतला. बहुतांश भागात रस्ते संपर्क पूर्वपदावर आल्याचं सिक्कीमच्या मुख्य सचिवांनी बैठकीदरम्यान सांगितलं. हवामानात सुधारणा झाल्यामुळे अडकलेल्या लोकांची सुटका करण्याचं काम सुरू झालं असून आज सकाळी ८० जणांची सुटका केल्याचं ते म्हणाले. २८ बचाव छावण्या उभारण्यात आल्या असून तिथं सहा हजार ८०० हून अधिक लोकांनी आसरा घेतला आहे. अन्न, औषधं आणि स्वयंपाकाचा गॅस अशा आवश्यक वस्तूंचा पुरवठा केला जात असल्याची माहिती त्यांनी दिली. उच्च स्तरावरून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवलं जात असून आंतर मंत्री समन्वय पथक सिक्कीममधे पोचल्याचं गृह सचिव अजय कुमार भल्ला यांनी सांगितलं.

**<><><><><>**

क्रीडा, सागरी उद्योग, सांस्कृतिक देवाण घेवाण, टांझानिया इथं औद्योगिक पार्क उभारणं आदी क्षेत्रात भारत आणि टांझानियामध्ये ६ सामंजस्य करार करण्यात आले. डिजिटल परिवर्तन, सागरी माहितींची पारदर्शक देवाण घेवाण आदी गोष्टींचा यात समावेश आहे.

**<><><><><>**

देशातल्या सर्व एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थांमध्ये लवकरच आयुषला समर्पित एक विभाग कार्यरत असणार आहे. त्यासाठी कुशल मनुष्यबळही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अशी माहिती केंद्रीय आयुषमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी केली. ते आज मुंबईत आयुष अभियानाच्या विभागीय आढावा बैठकीत बोलत होते. यावेळी महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, अंदमान निकोबार आदी राज्यातले प्रतिनिधी उपस्थित होते. मानवी शरीराला विविध आजारांपासून संरक्षण देण्याचे महत्त्वाचे काम आयुष मिशन करणार आहे.

**<><><><><>**

अर्थशास्त्रासाठीचा नोबेल पुरस्कार यंदा अमेरिकी अर्थतज्ञ क्लॉडीया गोल्डीन यांना जाहीर झाला आहे. त्या हार्वर्ड विद्यापीठात प्राध्यापक आहेत. अर्थव्यवस्थेत महिलांचं योगदान आणि कमाई याविषयीच्या विस्तृत संशोधनाबद्दल गोल्डीन यांची निवड करण्यात आल्याचं यल स्वीडीश अकॅडेमी ऑफ सायन्सेस नं सांगितलं.

कृषीप्रधान अर्थव्यवस्थेकडून औद्योगीकीकरणाकडे जगाची वाटचाल होत असताना महिलांना घर संसाराच्या मर्यादा पडल्याने एकूण अर्थव्यवस्थेत त्यांच्या श्रमांचा सहभाग जवळ जवळ २०० वर्ष वाढलाच नव्हता. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सेवाक्षेत्रात वाढ झाल्यानंतर महिलांच्या सहभागात वाढ झालेली दिसू लागली, असा निष्कर्ष गोल्डीन यांच्या संशोधनाने मांडला आहे. महिला आणि पुरुषांच्या श्रममोजणीत तफावत असल्याचंही त्यांनी मांडलं.

सुमारे १० लाख डॉलर्स मूल्याचे हे पुरस्कार येत्या डिसेंबरमधे ऑस्लो आणि स्टॉकहोम शहरात समारंभपूर्वक प्रदान केले जातील. विजेत्यांना १८ कॅरेट शुद्धतेचं सुवर्णपदक आणि सन्मानपत्रही दिलं जातं.

**<><><><><>**

आयसीसी एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत न्यूझीलंडनं नेदरलँड समोर विजयासाठी ३२३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. हा सामना हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सुरू आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा नेदरलँडच्या २८ षटकात ४ बाद १३१ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**